ठळक बातम्या

- ३० नोव्हेंबरला लोकसभेची तर २ डिसेंबरला राज्यसभेची विशेष बैठक

- संविधान दिनानिमित्त देशभरात विविध कार्यक्रम, २२ भाषांमधल्या संविधानाच्या प्रतींचं प्रकाशन

- यंदाच्या खरीप हंगामात गेल्या ५ वर्षांच्या सरासरीपेक्षा अधिक अन्नधान्य उत्पादन होण्याचा सरकारचा अंदाज

- साखर, मीठ किंवा चरबीचं प्रमाण जास्त असलेल्या पाकीटबंद खाद्यपदार्थांवर ठळक इशारा देणारी लेबल्स लावण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

आणि

- आगामी उत्तर प्रदेश निवडणुकीसाठी समाजवादी पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध

<><><><><>

अत्यावश्यक सरकारी कामकाज पूर्ण करण्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांची विशेष बैठक पुन्हा बोलावण्याची विनंती केंद्र सरकारनं लोकसभेचे सभापती आणि राज्यसभेच्या अध्यक्षांना केली आहे. ३० नोव्हेंबर रोजी लोकसभेची, तर २ डिसेंबर रोजी राज्यसभेची बैठक घेण्याचा प्रस्ताव सरकारनं दिला आहे. कामकाजाच्या गरजेनुसार दोन्ही सभागृहांचं कामकाज ३ डिसेंबर रोजी संपेल, असं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटलं आहे.

<><><><><>

बदलत्या काळाशी जुळवून घेत भारतीय न्यायव्यवस्थेनं न्यायाची मूलभूत तत्वं सातत्यानं जतन केली आहेत, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे.

नवी दिल्लीत सर्वोच्च न्यायालयानं आयोजित केलेल्या संविधान दिन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. तंत्रज्ञान अधिकाधिक प्रगत होत असताना संविधानकारांनी घालून दिलेल्या आदर्शांचं विवेचन भारतीय न्यायव्यवस्थेनं उत्तम रीतीने केलं असल्याचं त्या म्हणाल्या. भारतीय न्याय संहितेची अंमलबजावणी केल्यामुळे न्यायदान जलद करणं शक्य झालं, असा अभिप्राय त्यांनी दिला.

होल्ड - राष्ट्रपती बाइट

<><><><><><>

भारताचं संविधान ही फक्त एक कायदेशीर चौकट नसून ते राष्ट्राचा आत्मा असल्याचं प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं. संविधान दिनानिमित्त आज नवी दिल्लीत सर्व २२ अनुसूचित भाषांमध्ये संविधानाचं प्रकाशन केल्यानंतर ते बोलत होते. हे प्रकाशन म्हणजे भारताची भाषिक विविधता, लोकशाहीची समावेशकता आणि घटनात्मक मूल्यांचा उत्सव असल्याचं ते म्हणाले. संविधान दिनाच्या शुभेच्छा देताना त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह संविधान सभेतल्या सर्व सदस्यांना त्यांनी आदरांजली वाहिली.

<><><><><><>

राज्यघटना म्हणजे केवळ प्रशासनाची मार्गदर्शिका नाही, तर देशाच्या आशा, आकांक्षा आणि मूल्यांचं प्रतीक आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. नवी दिल्लीत संविधान गौरव दिवसाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. राज्यघटनेचा आदर करणं ही सर्व भारतीयांची अतिशय महत्त्वाची जबाबदारी आहे, असं ते म्हणाले.

<><><><><><>

२०२६-२७च्या खरीप हंगामातल्या पीक उत्पादनाचा पहिला अंदाज आज केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी नवी दिल्लीत इथं वार्ताहर परिषदेत जाहीर केला. महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगण आणि आंध्र प्रदेशात यंदा प्रतिकूल हवामान आणि

दुष्काळ असूनही ५ वर्षांतल्या सरासरीपेक्षा ९७ लाख ६७ हजार टन जास्त उत्पादन होईल, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला.

२०२५-२६ या वर्षात अन्नधान्याचं ३७ कोटी ८० लाख टन उत्पादन झालं असून गेल्या वर्षाच्या तुलनेत ते २०३ लाख टनांनी जास्त आहे. जगातला सर्वात मोठा भात उत्पादक देश हे स्थानही भारतानं सलग दुसऱ्या वर्षी कायम राखलं आहे, अशी माहिती चौहान यांनी दिली. यंदा देशात १५ कोटी ५० लाख टन भात उत्पादन झालं असून गेल्या वर्षीच्या तुलनेत ते ४९ लाख ७० हजार टनांनी जास्त आहे. गव्हाच्या उत्पादनातही भारतानं जगात दुसरा क्रमांक राखला आहे. गव्हाच्या उत्पादनात गेल्या वर्षीपेक्षा २७२ लाख टनांनी वाढ झाली असून ते १२ कोटी २० लाख टन झाली आहे, असं ते म्हणाले.

<><><><><><>

साखर, मीठ किंवा चरबीचं प्रमाण जास्त असलेल्या पाकीटबंद खाद्यपदार्थांवर ठळक इशारा देणारी लेबल्स लावण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने आज दिले. प्रत्येक पोषक घटकासाठी स्वतंत्र षटकोनी चिन्ह असावं, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं. हे नियम शिथिल केले, तर ही संपूर्ण योजनाच निष्फळ ठरेल, असं मत न्यायालयानं मांडलं. पाकिटांवर 'जास्त चरबी', 'जास्त साखर' किंवा 'जास्त मीठ' असे स्पष्ट शब्द असावेत. FSSAIनं चार महिन्यांच्या कालमर्यादेत हे नियम लागू करावेत, असे निर्देशही न्यायालयानं दिले. त्यानंतर कंपन्यांना या नव्या नियमांनुसार बदल करण्यासाठी ३६५ दिवसांचा संक्रमण कालावधी मिळणार आहे. चिप्सपासून बिस्किटं आणि शीतपेयांपर्यंत सगळ्या खाद्यपदार्थांना हे नियम लागू असतील.

<><><><><><>

उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी समजावादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. महिलांना दर वर्षी ४० हजार रुपये अर्थसहाय्य, ३०० युनिट वीज मोफत देण्याच्या घोषणांचा त्यात समावेश आहे. "हर

हाथ को काम, हर किसान को दाम, महिलाओं का सम्मान और कानून का मान" अशी या घोषणापत्राची संकल्पना आहे. उत्तरप्रदेशात पुढच्या वर्षी निवडणूक होणार आहे.

<><><><><><>

टाटा सन्स आणि त्यांचे ६ संचालक तसंच एन. चंद्रशेखरन यांच्या कार्यकारी अध्यक्षपदी पुन्हा झालेल्या निवडणुकीला सर दोराबजी टाटा ट्रस्ट आणि आर. डी. टाटा ट्रस्टनं मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. उद्या या याचिकेवर सुनावणी होणार आहे. दोराबजी ट्रस्टनं याप्रकरणी ५० कोटी तर आर. डी. ट्रस्टनं १५ कोटी रुपयांची नुकसानभरपाई १८ टक्क्यांच्या व्याजासह मागितली आहे. कंपनीच्या नियमांनुसार आवश्यक संचालकांच्या मंजुरीशिवाय चंद्रशेखरन यांची फेरनियुक्ती झाली आहे, त्यामुळं ती अवैध असल्याचं याचिकाकर्त्यांचं म्हणणं आहे.

<><><><><><>

मानवाधिकार कार्यकर्ता आणि ऑस्कर नामांकनप्राप्त पटकथाकार मेहदी मेहमूदियन यांना इराणची राजधानी तेहरानमधल्या त्यांच्या घरातून काल अटक करण्यात आली. या अटकेमागचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नसून इराणनं या बाबतीत कोणतंही निवेदन दिलेलं नाही.

<><><><><><>

फुटबॉलची जागतिक प्रशासकीय संस्था, फिफावर सायबर हल्ला झाला असून, त्यांची काही वैयक्तिक आणि व्यावसायिक माहिती हॅकर्सकडे गेल्याचं आज समोर आलं. संबंधित अधिकारी आणि कायदेशीर संस्थांबरोबर या प्रकरणाचा तपास करत असल्याचं फिफानं निवेदनात म्हटलं आहे. हा सायबर हल्ला नेमका कधी झाला किंवा हॅक झालेली माहिती नक्की कोणत्या स्वरूपाची आहे, याबाबत फिफानं कसलीही माहिती दिलेली नाही.

<><><><><><>

२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यात हुतात्मा झालेल्या जवानांना आणि नागरिकांना आज देशभरातून आदरांजली वाहिली जात आहे.

या दहशतवादी हल्ल्यादरम्यान निर्भयपणे लढलेले शूर जवान, पोलीस कर्मचारी आणि इतर सर्वांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज आदरांजली वाहिली. समान माध्यमावरच्या संदेशात राष्ट्रपतींनी म्हटलं आहे की, या सैनिकांचं बलिदान आणि सेवा देशवासीयांच्या आठवणीत कायम राहील.

मुंबईवरच्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्या निष्पाप नागरिकांना आणि त्या भ्याड हल्ल्याला तोंड देणाऱ्या सुरक्षा जवानांच्या अतुलनीय धैर्याला उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी सलाम केला. सर्व प्रकारच्या दहशतवादाविरुद्ध 'झीरो टॉलरन्स' धोरण राबवण्याबाबत आणि या हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्यांना शिक्षा देण्याबाबत भारत पूर्णपणे वचनबद्ध असल्याचं त्यांनी सांगितलं.

२६ नोव्हेंबर रोजी मुंबईवर झालेल्या हल्ल्यात दहशतवाद्यांशी लढताना शहीद झालेल्या जवानांना राज्यपाल जिष्णू देव वर्मा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज आदरांजली वाहिली. पोलीस मुख्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती आणि इतर अधिकारी उपस्थित होते. पोलीस अधिकारी-कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी राज्य शासनानं विविध निर्णय घेतल्याचं सांगितलं. राज्यपाल आणि मुख्यामंत्र्यांनी २६/११ हल्ल्यात शहीद झालेल्या पोलिसांच्या कुटुंबीयांचीही यावेळी भेट घेतली.

<><><><><><>

२०३६ च्या ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिक क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी भारतानं आज आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या 'फ्युचर होस्ट कमिशन'सोबत झालेल्या ऑनलाइन चर्चेदरम्यान आपला दृष्टीकोन आणि प्रस्तावित रोडमॅप सादर

केला. यात देशातल्या क्रीडा पायाभूत सुविधांच्या जलद विकासावर भर देण्यात आला. या ३० मिनिटांच्या सादरीकरणानंतर सुमारे २० मिनिटांची संक्षिप्त चर्चाही झाली.

या सादरीकरणात प्रस्तावित यजमान शहर असलेल्या अहमदाबादच्या सज्जतेचा आढावा घेतल्याचं भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

//<><><><><><>//